महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजिवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ अंतर्गत कलम ५ व कलम २२ अंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रकरणांवर जलद गतीने निर्णय घेण्यासाठी प्रधान सचिव (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेली उपसमिती बरखास्त करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग,उर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय :- क्र. युडब्ल्युए-२०१६/प्र.क्र.४३८/कामगार-५
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- १० ऑक्टोबर, २०१७

<u>वाचा</u> : १) शासन निर्णयः- क्र. युडब्ल्युए-२०१६/प्र.क्र.४३८/कामगार-५, दि. २९ डिसेंबर, २०१६.
२) शासन शुध्दीपत्रक : क्र. युडब्ल्युए-२०१६/प्र.क्र.४३८/कामगार-५, दि. २ जानेवारी, २०१७.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र माथाडी, हमाल इतर श्रमजिवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ च्या कलम ५ अंतर्गत विविध आस्थापनांकडून त्यांच्या आस्थापनेस माथाडी कायद्याच्या तरतूदी लागू होतात किंवा कसे, याबाबत विवाद उपस्थित करण्यात येतात. तसेच, एखाद्या आस्थापनेवरील माथाडी स्वरूपाचे काम करणाऱ्या कामगारांना माथाडी मंडळातील नोंदित कामगारांप्रमाणेच मजुरी व इतर फायदे मिळत असल्यास, अशा आस्थापना उक्त अधिनियमाच्या अंमलबजावणीतून सुट मिळण्यासाठी कलम २२ अंतर्गत अर्ज करतात. असे कलम ५ व २२ खालील अर्ज महाराष्ट्र माथाडी, हमाल इतर श्रमजिवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ च्या कलम १४ च्या तरतूदीनुसार महाराष्ट्र राज्य माथाडी सल्लागार समितीसमोर विचार विनिमयार्थ ठेवण्यात येतात.

महाराष्ट्र राज्य माथाडी सल्लागार समितीने दि. ६.९.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये समितीने कलम ५ व २२ अंतर्गत प्राप्त होणारे अर्ज प्रधान सचिव (कामगार) यांच्या अध्यक्षतेखालील उप समितीसमोर न ठेवता महाराष्ट्र राज्य माथाडी सल्लागार समितीसमोर विचारविनिमयार्थ ठेवण्यात यावेत अशी शिफारस केली आहे. या शिफारशीनुसार संदर्भाधीन दि. २९.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रधान सचिव (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेली उपसमिती बरखास्त करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संकेतांक क्रमांक २०१७१०१०१११६५२१५१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Sanjay Vithoba Kalbhor
Date: 2017.10.10 17:57:40 +05'30'

(संजय काळभोर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई (पत्राने)
२) मा. मुख्यमंत्री, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.विरोधी पक्षनेता,महाराष्ट्र विधानसभा,अ-६, मंत्रालय समोर,नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०३२
५) मा.विरोधी पक्षनेता,महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई-४०० ०३२
६) मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई
८) प्रधान सचिव (उद्योग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९) प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१०) प्रधान सचिव, विधान मंडळ सचिवालय यांचे स्वीय सहायक विधानभवन मुंबई - ३२
११) कामगार आयुक्त, कामगार भवन,सी-२०, ई-ब्लॉक,वांद्रे-कुर्ला संकुल,वांद्रे(पूर्व), मुंबई-५१.
१२) अतिरिक्त उद्योग संचालक, उद्योग संचालनालय, मुंबई.
१३) सह कामगार आयुक्त,कामगार भवन,सी-२०, ई-ब्लॉक,वांद्रे-कुर्ला संकुल,वांद्रे(पूर्व),मुंबई-५१.
१४) कामगार उप आयुक्त, कामगार भवन,सी-२०, ई-ब्लॉक,वांद्रे-कुर्ला संकुल,वांद्रे(पूर्व),मुंबई-५१.
१५) महाराष्ट्र राज्य माथाडी सल्लागार समितीचे सर्व सन्माननीय सदस्य.
१६) माहिती व जनसंपर्क संचालनालय मंत्रालय मुंबई-३२
१७) अध्यक्ष, सर्व माथाडी मंडळे.
१८) सर्व कार्यासने, कामगार विभाग मंत्रालय मुंबई.
१९) निवडनस्ती (कामगार-५).